**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५४०/२०२५**

भाऊराव वि. उत्रेश्वर

निशाणी क्रमांक **३२ खाली**

**अर्ज निशाणी क्रमांक ४२ वरील आदेशान्वये वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ भाऊराव कलयाण साबळे यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. डी. ए. निकाळजे यांच्यामार्फत**

११. मी वाद मिळकतीत राहतो. साक्षीदार पुन्हा सांगतो की मी वाद मिळकतीपासून जवळ राहतो. मी राहत असलेल्या घरापासून प्रतिवादीने बांधलेले शेड २०० फुट अंतरावर आहे. वाद जमीन बागायत आहे. ९ एकरात सध्या ऊसाचे पीक आहे. साधारणतः एक वर्षापुर्वी ऊसाची लागवड झाली आहे. वाद जमीन वडीलोपार्जित असल्याकारणाने मी मोजुन घेतलेली नाही. वाद जमिनीत माझ्यासह प्रतिवादी क्रमांक १ व २ हे खातेदार आहेत. वाद जमिनीच्या पुर्वेस धरण, पश्चिमेस उपसा सिंचनच आहे, उत्तरेस योगिराज लक्ष्मण पाटील आणि दक्षिणेस प्रतिवादी वहिवाट असलेली जमीन.

१२. सगाजी दुबळे यांची जमीन वाद जमिनीच्या दक्षिण बाजुने प्रतिवादी वहिवाट असलेलया जमीन सोडून खुप लांब आहे. तात्या पवार यांना मी ओळखत नाही. मी वाद जमिनीची सरकारी मोजणी करुन घेतलेली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की माझ्या वडीलांनी मोजणी करुन घेतली होती. वडीलांनी करुन घेतलेली मोजणीचे कागदपत्र मी दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यात असलेल्या जमिनीपेक्षा जास्त क्षेत्र शासनाने माझ्या वडीलांच्या नावे जमीन असताना संपादित केली होती. सर्वे क्रमांक २७ पैकी ४ हे. ३ आर क्षेत्र साधारणतः १९९४ साली संपादित झाले होते. त्यानंतर ७१ आर क्षेत्र सिना कोळेगाव प्रकल्पासाठी संपादित झालेले होते. प्रतिवादी क्रमांक १ हा वाद जमिनीच्या दक्षिण बाजुने लगत दीड एकराच्या क्षेत्रावर वहिवाट करुन त्याठिकाणी राहण्यासाठी शेड मारलेले आहे. प्रतिवादी क्रमांक २ हा कोणत्या क्षेत्रावर वहिवाट करतो याबाबत मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्रमांक १ हा वहिवाट करीत असलेलया क्षेत्रात ऊस लावलेला आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की डोमगाव ग्रामपंचायतीने मी गायरान जमिनीवर अतिक्रमण

केल्याबाबतचा ठराव केला होता. साक्षीदार स्वतः सांगतो की, राजकीय द्वेषापोटी तसा ठराव पारीत झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, ठराव बाबत मला ग्रामपंचायतीने कळविले होते. गट क्रमांक २६ मधील गायरान जमीन वहिती करण्यासाठी तात्या पवार यांनी शाखाधिकारी सिंचन, डोंमगाव यांच्याकडून परवानगी घेतली होती, याबाबत मला माहिती नाही. वाद जमीन मी आणि माझे वडील दोघे मिळून वहिती करीत आहोत. वाद जमिनीच्या हद्दीखुणा मला माहिती आहेत. वाद जमिनीच्या कोणत्या बाजुची किती क्षेत्र संपादित झाले आहे हे आज रोजी मला सांगता येणार नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी हे आमच्या नातेसंबंधातील नाहीत. दावा दाखल करण्यापुर्वी आमचे व प्रतिवादी यांचे भांडण झाले नव्हते. साक्षीदार पुन्हा सांगतो दावा दाखल करण्यापुर्वी वाद विवाद झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की गट क्रमांक २७ मध्ये महाराष्ट्र शासन सिना कोळेगाव प्रकल्प आणि सिना कोळेगाव प्रकल्प व उद्धारण नलिका मध्ये खातेदार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी वरील दोघांना दाव्यात प्रतिवादी पक्षात समाविष्ठ केलेले नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, त्यांना पक्षकार करण्याची मला आवश्यता वाटली नाही.

१५. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी यांच्याविरुद्ध आंबी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे कागदपत्र मी दाखल केले नाहीत. मी आणि सिना कोळेगावचे अधिकारी यांनी मिळून आजपर्यंत मोजणी करुन घेतलेली नाही. वाद जमिनीच्या पश्चिम–दक्षिण कोपऱ्यात किती गायरान जमीन होती हे आज रोजी मला सांगता येत नाही. मी वाद जमिनीच्या पश्चिमेकडील बाजुने मध्यभागी राहण्यास आहे. मी राहत असलेल्या घरापासून वाद जमिनीचा बांध पश्चिम बाजुने १०० फुटावर आहे. माझ्या घराचा दक्षिण बाजुचा जमिनीचा बांध १५० फुटावर आहे. मी राहत असलेल्या घरापासून पुर्वेकडील बांध ५०० फुटाच्या अंतरावर आहे. मी राहत असलेल्या घरापासून उत्तरेकडील बांध २५० फुट अंतरावर आहे.

प्रश्नः– वरीलप्रमाणे तुमच्या घरापासून जमिनीचे बांधाबाबत जे तपशील दिलेला आहे त्या क्षेत्रावर प्रतिवादी यांची वहिती आहे काय?

उत्तरः– माझ्या घरापासून दक्षिणेकडील २०० फुटावर प्रतिवादींची वहिती आहे.

१६. वाद जमिनीच्या पश्चिम–दक्षिण कोपऱ्यात असलेली गायरान जमीन कोणाच्याही कब्जात नव्हती. साखीदार स्वतः सांगतो की ती जमीन संपादित झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २३.१०.२०१७ व २१.०१.२०१८ रोजी मी प्रतिवादी यांच्याविरुद्ध पोलिसांकडे खोटी तक्रार दिली होती. प्रतिवादी हे माझ्या जमिनीवर अतिक्रमण करीत असले बाबत मी तक्रार दिली होती. दिनांक १५.०२.२०१८ रोजी दिलेल्या तक्रारीत देखील प्रतिवादी हे माझ्या जमिनीत अतिक्रमण करीत असलेबाबत उल्लेख केला होता.

१७. प्रतिवादी यांच्याकडे बैल–बारदाना नाही. प्रतिवादी यांच्या मालकीचे ट्रक्टर आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. वाद जमिनीत ऊसा व्यवतिरिक्त दुसरे पीक घेत नाहीत. कधीही मी दुसरे पीक घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीतील उस काढताना प्रतिवादीने कधीही अडथळा निर्माण केला नव्हता. प्रतिवादीने माझ्या जमिनीवर अतिक्रमण केले म्हणून मी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीने माझ्या जमिनीवर केलेल्या अतिक्रमणाबाबत मी मोजणी करुन घेतलेली नाही. वाद जमीन क्षेत्र ९ एकर २७ गुंठे आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नंबर २७ मधील ३ हे. ६६ आर संपुर्ण क्षेत्र माझ्या कब्जात आहे. साक्षीदार स्वतः सांगतो की माझ्या कब्जातील काही क्षेत्रावर प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले आहे. वाद जमिनीव्यतिरिक्त माझ्या नावे दुसरी जमीन नाही. मला मराठी भाषा लिहिता वाचता येते. मी वादपत्रासोबत परिशिष्ट अ नुसार कच्चा नकाशा दाखल केला आहे तो बरोबर आहे. सदर नकाशात पुर्व व पश्चिम बाजुने संपादित जमीन असा उल्लेख आहे. सदर नकाशात उत्तर बाजुने गट नंबर २६ असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

१८. श्रीमंत चंद्रसेन पवार यांना मी ओळखतो. ते माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करतेवेळेस ते माझ्याकडे राहण्यास होते आता सध्या ते

माझ्याजवळ राहत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने माझ्या क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने माझ्या क्षेत्रात घराचे शेड बांधले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.01.20 11:34:21 +0530

दिनांकः–१९.०१.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 19-01-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 19-01-2026 |
| Order uploaded on | - | 20-01-2026 |